नुकत्याच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अनेक निकालांपैकी डान्सबारसंबंधीचा निकाल हा सर्वात लक्षणीय म्हणून गणला गेला पाहिजे. ह्या निकालाने बारबाला आणि त्यांच्या संघर्षाचे नुसते समर्थन होत नाही तर भारतीय स्त्रिया ज्यांना तथाकथित 'सभ्य' जगात उपेक्षित ठेवले गेले, ज्यांचे ह्या मार्गाने उदरनिर्वाह करणे शासनाने भुईसपाट केले, त्यांच्या घटनात्मक अधिकाराची बाजूही उचलून धरली.

ह्या निकालाच्या पार्श्वभूमीवर, मी काही वादग्रस्त मुद्द्यांवर चर्चा करू इच्छितेः राज्यशासन आणि त्याची घटकतत्त्वे जसे पोलिस, आमदार, मंत्री, महीला राज्य आयोगाचे खालच्या वर्गाच्या स्त्रियांचे लैंगीकते बाबतचे समज, नागरिक म्हणून त्यांचे हक्क, कामकाजाच्या निवडीबाबतचे त्यांचे स्वातंत्र्य किंवा स्वातंत्र्याचा अभाव या साऱ्या बाबतचे दृष्टिकोन हे ते मुद्दे आहेत. माझा मतभेद हा आहे की हे वादाचे विषय सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रात चर्चिले गेले. राष्ट्र आणि संस्कृतीच्या प्रभावी विचारसरणींकडून स्व-हितासाठी हवे त्यानुसार त्यांचा अंतर्भाव व वगळणूक करून त्यांची विल्हेवाट लावण्यात आलेली आहे. विशेष महत्त्वाचा प्रश्न हा आहे की खालच्या जातीच्या / वर्गाच्या स्त्रियांच्या लैंगिकतेचा वापर सांस्कृतिक सेवा निर्मितीच्या रूपाने सांस्कृतिक अर्थकारणात केला जातो. जिथे आर्थिक कृतींची मुळे सांस्कृतिक अर्थामध्ये दडलेली असतात. ज्याअर्थी हे नाट्य जागतिकीकरणाच्या परिणामस्वरूप अनिश्चित पार्श्वभूमीवर उभारण्यात आले आहे त्याअर्थी जागतिकीकरण आणि त्यांच्या सांस्कृतिक उणिवांतील शोध घेणं मनोरंजक ठरेल.

# बार बार डान्स

— माया पंडित

(हा लेख ''इकॉनोमीक ॲण्ड पॉलिटीकल वीकली'' १०-०८-२०१३, मासिकातील अंकामधुन लेखकाच्या परवानगीने पुर्नमुद्रीत व अनुवादीत केला आहे.)



# पार्श्वभूमी

जेव्हा महाराष्ट्र शासनाने बारमधील नृत्यावर बंदी घातली आणि तेथे काम करणाऱ्या जवळपास ७५,००० मुली अचानक बेरोजगार झाल्या त्यावेळी महाराष्ट्राचे लोक उच्च नैतिकतेच्या भूमिकेवरून खालची पातळी गाठण्याच्या घटनेचे साक्षीदार झाले. याबाबतीत बराच गदारोळ झाला. उपेक्षीत स्त्रियांविषयीचे (The Gendered Subaltern) नवे मुद्दे जसे - लिंग, कायदा, राज्यशासनाचे कार्यक्षेत्र व विचारक्षेत्र राज्यकारभार व सुशासन यांच्या नावाने नैतिक धोरण. हे वादविवादाचे केंद्रबिंदू झाले.

एका सूक्ष्म पातळीवर, हा वाद खालच्या जातीच्या स्त्रीच्या लैंगिकतेचा, अनेक घटकांनी बनलेल्या गुंतागुंतीच्या रचनेचा तसेच राज्यशासनासाठी त्यांचे कामजीवन कसे चिंतेचा विषय बनले याचे प्रतिनिधित्त्व करतो. त्यासोबतच स्त्रीचळवळीतील कामाची व्याख्या लैंगिकता आणि जातीचे प्रश्न इ. संदर्भातील भेदही हा वाद पुढे आणतो.

एका स्थूल पातळीवर, उदारीकरणाच्या प्रक्रियेत व भारतातील बाजारानुवर्ती सुधारणांमध्ये राज्यशासन हे एक स्वतंत्र घटक म्हणून दुर्बल झाले असून ते आपली आर्थिक आणि राजकीय शक्ती गमावून बसले आहे, असे सुचवण्यात आले आहे. राज्यशासन आपली सर्व शक्ती वापरू शकेल असे संभवतः एकमेव सांस्कृतिक क्षेत्र उदयाला आले आहे. खालच्या जातीच्या /वर्गाच्या स्त्रीच्या लैंगिकतेच्या वादविवादाचा विषय वस्तुतः लोकशाही आणि नागरिकत्वावरील वादविवादाचा विषय असून जागतिक अर्थकारणात सामाजिक न्यायाच्या संभाव्यतेचा प्रश्न उपस्थित करतो. मी म्हणते की या उपेक्षित-दुर्लक्षित स्त्रियांच्या समस्यांचे अर्थपूर्ण विश्लेषण फक्त भारतातच नाही तर आज संबंध दक्षिण आशियात जागतिकीकरण, बाजाराचे अर्थकारण यांनी घडवून आणलेल्या स्थूल पातळीवरील विकासाच्या आणि राज्यशासनाच्या भूमिकेवरील परिणामांच्या संदर्भातच फक्त केले जाऊ शकते.

खालील पृष्ठांमध्ये, सुरुवातीला मी घटना जशा घडत गेल्या त्यांचे संक्षिप्तपणे कथन करणार आहे राज्यशासनाची कार्यवाही, बारमालक, राज्यशासन आणि न्यायसंस्था यांमधील कायदेशीर संघर्ष, स्त्रीसंघटनांची मध्यस्थी, बारबालांनी केलेला निषेध आणि त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे यानंतर बारबालांचा सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहास चर्चिला जाईल. ही चर्चा, प्रगती, विकास, बाजाराचे अर्थकारण आणि सांस्कृतिक सेवांच्या रूपाने केलेले खालच्या जातीच्या स्त्रियांच्या परिश्रमाचे शोषण या सर्वांच्या बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केली जाईल. लैंगिकतेच्या समस्या आणि राज्यशासन यांमधील संबंध जागतिकीकरणाच्या वातावरणातील उजव्या विचारसरणीचा उदय यांवर टीका केली जाऊन ती चर्चा, दारिद्र्याचे अबलाकरण आणि संपूर्ण दक्षिण आशियातील खालच्या जातीच्या स्त्रियांचे नागरी व ग्रामीण भागांतील दारिद्र्याचे वाढते प्रमाण यांच्याशी जोडली जाईल.

# गोष्टीची उजळणी : घटनाक्रम

३१मार्च २००५ रोजी ‘कॉल अटेंशन मोशन’ जाहीर करून डान्सबारचा मुद्दा जयंत पाटील (शेतमजूर आणि कामकरी पक्ष), बाळ नांदगावकर (शिवसेना), शोभा फडणवीस (भाजप) आणि इतरांनी महाराष्ट्राच्या विधिमंडळात मांडला. महाराष्ट्राचे गृहमंत्री तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसपक्षाचे (कॉंग्रेस पक्षाच्या युतीसरकारातील एक भागीदार) श्री. आर.आर. पाटील यांनी मुंबई व्यतिरिक्त महाराष्ट्राच्या इतर भागातील

डान्सबार तात्काळ बंद करण्याची घोषणा केली. त्यानंतर १३ एप्रिल २००५ पासून ही बंदी संपूर्ण महाराष्ट्राभर करण्यात आली. राज्यशासनाने १८ मे रोजी यांसंदर्भात एक वटहूकूम काढला आणि तो तत्कालीन राज्यपाल श्री. एस. एम. कृष्णा यांच्याकडे ३ जून रोजी संमतीसाठी पाठवला. परंतु त्यांनी तो २३ जून रोजी बारबारलांच्या पुनर्वसनाच्या मुद्याबद्दल स्पष्टीकरण मागत परत पाठवला. त्यांनी त्यात शासनाने वटहुकूमाऐवजी पावसाळी अधिवेशनात नियमित विधेयक (Bill) सादर करण्यास सांगितले. त्यानंतर राज्यशासनाने बॉम्बे पोलिस ॲक्ट १९५१ च्या सुधारणेसाठी एक विधेयक सादर केले आणि १४ जुलैला त्यात सुधारणा करण्यात आली. महाराष्ट्र राज्याच्या दोन्ही सभागृहांनी सुधारणेला मंजुरी दिली. ९ ऑगस्ट रोजी राज्यपालांनी विधेयकास मंजूरी दिली आणि संपूर्ण महाराष्ट्रातील डान्सबार १५ ऑगस्ट २००५ (स्वातंत्र्यदिनाचा योग साधून) पासून बंद करण्यात आले. 'घाणेरडेपणा, अनैतिकता आणि वासना यांपासून शहराची मुक्ती' अशा शब्दांत बंदीचा विचार व्यक्त झालेला होता. या कायद्यांतर्गत पंचतारांकित हॉटेल्स तसेच खाजगी क्लब्स आणि जिमखान्यांना 'सांस्कृतिक संवर्धन आणि पर्यटन विकास' या सबबीखाली सूट देण्यात आलेली होती. त्याठिकाणी नृत्य सादरीकरण होऊ शकत असे.

अशाप्रकारे डान्सबारमध्ये काम करणाऱ्या अंदाजे ७५,००० बारबालांनी आपली कामे आणि पर्यायाने उदरनिर्वाहाचे साधन गमावले. बारमालक आणि बारबालांच्या संघटना आणि युनिअन्स या बंदीच्या विरोधात न्यायालयात गेले. त्यानंतर उच्च न्यायालयाने (न्यायाधिश श्री. एफ. आई. रेबेलो आणि श्री. रोशन दळवी) १२ एप्रिल २००६ रोजी बंदीला 'घटनाबाह्य' ठरवत मागे घेतली. राज्यशासनाने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. न्यायालयाने पुढील आदेश येईपर्यंत डान्सबार परवान्यांच्या नुतनीकरणावरील बंदी चालू ठेवली. संशोधकाच्या माहितीनुसार सर्वोच्च न्यायालयाने अंतिम निकाल दिला की नाही, हे शंकास्पद आहे दरम्यान, डान्सबारवरील बंदी चालूच आहे. या अनुषंगाने पुढे आलेल्या बऱ्याच विवादास्पद मुद्यांची चर्चा करण्यापूर्वी राज्यातील डान्सबारच्या इतिहासावर संक्षिप्त दृष्टिक्षेप उपयुक्त ठरू शकेल.

# महाराष्ट्रातील डान्सबारचा इतिहास

डान्सबारचा इतिहास हा स्वातंत्र्यपूर्व मुंबईमधील डान्स क्लब्स / नृत्य शाळा / कॅबरे बार यांपासून सुरू होतो. स्त्रियांची सेवा देणारे बार ग्रॅन्ट रोड आणि परेल येथे १९७० च्या आसपास आले आणि सत्तरच्या दशकातील शेवटच्या काही वर्षांत उपनगरांत पसरले. तथापि, बऱ्याच उपाहारगृहांना मद्याचे परवाने मिळाल्याने डान्सबार १९८० नंतर मोठ्या प्रमाणावर पसरले. ऑर्केस्ट्रा आणि नकला करणाऱ्या कलाकारांच्या बळावर बारमधील करमणूक वाढीस लागली. यानेच वाढत्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी 'नृत्य आणि मद्य' अशा आकर्षक सुविधेस चालना मिळाली(१). परमिट रुम, देशी दारूचे बार, फॅमिली रेस्टॉरंट आणि बार, लेडिज सर्विस बार, डान्सबार आणि डिस्कोबार असे बिअर बारचे वेगवेगळे प्रकार आहेत. डान्स बार आणि डिस्कोबार या दोन्ही ठिकाणी स्त्रिया नर्तिका म्हणून काम करतात. या दोन्हींमध्ये कायदेशीररीत्या काही फरक नाही. यांच्याकडे मनोरंजन आणि सादरीकरणाचे कायदेशीरपणे परवाने असून ते दररोज कर भरतात. नर्तिका डान्सबारमध्ये सामान्यतः घागराचोली घालतात आणि ग्राहकांना त्यांच्याबरोबर नाचण्याची परवानगी नसते. परंतु डिस्कोबारमध्ये ग्राहक नर्तिकांसोबत नाचू शकतात.

---

१) वर्षा काळें यांचे महाराष्ट्र शासनाचे राज्यपाल, श्री. एस.एन.कृष्णा, यांना पत्र http://www.nswq.org/rights/bargirls/letter.governor.html, प्राप्त झाले दि. १३ जून २००९ वर्षा काळे

ऐंशीच्या दशकानंतर महाराष्ट्र शासनाने त्यातील बिअर आणि लिकर बारमध्ये संगीत आणि नृत्य सादरीकरणाला परवानगी देण्याचे धोरण स्वीकारले त्यायोगे त्यांना भरभक्कम महसूल, जकात आणि परवाना शुल्क इ, मिळाले. अशा प्रकारे मुंबई आणि परिसरात तसेच उर्वरित महाराष्ट्रातील शहरांत बार फोफावत गेले. १९८६ मध्ये फक्त २४ डान्सबार शहरात होते. वर्षभरात हा आकडा ३२ आणि दशकात २०६ वर पोचला. २००५ पर्यंत हा आकडा १२५० पर्यंत गेला. अशा बारसंदर्भात निरनिराळी आकडेवारी सांगणारे अहवाल उपलब्ध आहेत. दैनिक सकाळमध्ये ३१ मार्च २००५ रोजी प्रकाशित एका रिपोर्टनुसार महाराष्ट्रात एकूण १७१५ अधिकृत बार आहेत. परंतु हाच अहवाल सांगतो की इथे २९१ डान्सबार, १९६ बार स्त्रियांना वेटर म्हणून काम बहाल करणारे, १६०३ परमिट रुम्स, आणि ११२ बिअर बार (एकूण २२०२) आहेत. याच दिनांकाच्या दैनिक लोकमतनुसार मुंबई आणि ठाणे या ठिकाणी जे १३५६ डान्सबार आहेत त्यापैकी ७३० एकटया मुंबईमध्ये आहेत. एका दुसऱ्या अहवालानुसार, रायगड जिल्हयातील (पीडब्ल्यूपी मतदारसंघ) एकट्या पनवेलच्या आसपास अशा प्रकारचे ४२ बार आहेत(२). सिनेमाव्यतिरिक्त 'लोकरंजनासाठी' परवाने देऊ करणाऱ्या १९६० च्या कायद्यान्वये अधिकृत डान्सबार काम करतात. तसेच स्त्रियांना वेटर म्हणून राबवणारे बार 'दुकान आणि अस्थापना' नुसार काम करतात. तथापि, मुंबई आणि उर्वरित महाराष्ट्रात किती अनधिकृत/खाजगी डान्सबार अस्तित्वात आहेत हे स्पष्ट झालेले नाही. अनेक राजकारणी तसेच निवृत्त व कार्यरत पोलिस अधिकाऱ्यांच्या मालकीचे बरेच बार आहेत, असा आरोप केला गेला आहे. या बारमधील दररोजचा गल्ला रु.५०,०००/- ते रु.५,००,०००/- पर्यंत आहे.

डान्स बारचा विकास हा व्यापारी महानगरांचा उदय आणि १९८० च्या शेवटच्या काही दशकांतील नव्याने श्रीमंत झालेल्या मध्यमवर्गीयांच्या करमणुकीच्या मागणीशी जोडला गेला आहे. सुमारे ७५,००० स्त्रिया नर्तिका / वेटर म्हणून काम करतात. त्यांचे वेतन महिन्याला रु. ३०००/- ते रु. ५०००/- दरम्यान आहे असा अंदाज केला गेला आहे. परंतु त्यांची दररोजची कमाई खर्च वजा जाता ५० रुपयांच्या आतच असते. त्यांची स्वतःची बँकेत खाती नाहीत तसेच यांची कुठे पतही नाही. त्यांचे काम मद्याशी निगडित असल्याने त्यांचा कल व्यसनांकडे आहे. त्यांना वेतन मिळत नाही आणि त्यांची कमाई ग्राहकांनी दिलेल्या टिप्सवर अवलंबून असते. यातील ३० टक्के कमाई बारमालक नृत्याच्या जागेचे भाडे, अन्न आणि ने-आणीसाठी घेतात. सौदर्यप्रसाधन आणि महागड्या कपड्यालत्यात भरपूर पैसा खर्च केला जातो. बार बंद करण्याचा अधिकृत वेळ बारमालकांकडून क्वचितच पाळला जात असल्याने त्यांना संध्याकाळी, रात्री बहुधा मध्यरात्रीनंतरही काम करावे लागते. या बारबालांपैकी बऱ्याच जणी मुंबईत आहेत. त्यातील बहुसंख्य महाराष्ट्राच्या इतर प्रांतातून किंवा देशाच्या उर्वरित भागातून आल्या आहेत. (राज्यशासनाच्या दाव्यानुसार फक्त चार टक्के महाराष्ट्रीयन आहेत. परंतु या आकडेवारीमागील आधार स्पष्ट केला गेला नाही) त्यातील बऱ्याच कर्मचारी विवाहित असून त्यांना मुलेबाळे आहेत. केलेल्या आरोपांच्या अगदी उलट परिस्थिती, म्हणजे त्यातील सर्वच वेश्याव्यवसाय करत नाहीत. त्यातील काही ग्राहकांशी नियमितपणे संबंध ठेवत असल्याची शक्यता आहे. काम केले तर त्या दिवसाचे वेतन मिळणार अशी परिस्थिती म्हणजे त्यांचे हातावर पोट असते.

त्यांना कायमस्वरूपी निवारा नाही. पोलिसांकडून शोषण हे त्यांचे नेहमीचे संकट आहे. कित्येकदा पुरुष ग्राहकांकडून त्यांची फसवणूक होते. पोलिस त्यांचे लैंगिक, आर्थिक आणि भावनिक छळ करतात. चौदा ते पन्नास वयोगटातील मुली याअंतर्गत येतात. त्यांचे वास्तव्य कोंडवाड्यात, उपेक्षित वस्त्यांत असते. आजूबाजूच्या समाजाने त्यांना

२) AIDWA विधान

वाळीत टाकलेले असते(३). त्यातील अनेक निरक्षर आणि अर्धसाक्षर असून अत्यंत दारिद्र्यात जगतात. त्यांना दुसरी कुठली नियमित नोकरी मिळण्याची शक्यता नसते. वाढत्या बारच्या संख्येमुळे बारबालांची मागणी वाढती राहिली आहे. भारतातील अनेक पारंपरिक जमाती या मागणीच्या पूर्तीसाठी पुढे आल्या. या जमातींची अवस्था आणि भारतीय शासनाने अवलंबिलेल्या विकास पद्धती यांमधील संबंध समजून घेणे महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## उपेक्षित बारबालांचा सामाजिक इतिहास: समाजातील निम्नस्तरातलं स्थान :-

बारबाला ह्या एकतर एस.सी, एस.टी, इतर मागासवर्गीय, एन.टी, किंवा मुसलमान समाजातील मागासवर्गीय तसेच बेडिया, भाट, धनवट, गांधर्व, चारी, राजनट आणि नट, चिलबिला, केसरवानी, बोगमवोल्लू, समलिधर, सनसी, कश्मिरी, डेरेदार, जागरी, डोली, इ. जातीतील असतात. या जाती दिल्ली आणि लगतचा परिसर, आग्रा, उत्तर प्रदेश, बिहार, हरियाणा, बंगाल, राजस्थान आणि महाराष्ट्रातील, मागासलेल्या भागात विखुरलेल्या आहेत(४). जात / वर्गाच्या क्रमवारीत प्रतिष्ठेच्या निम्नस्तरावर असल्यामुळे, नागरिकत्व असूनसुद्धा त्यांचे समाजप्रतिमेतील नित्याचे स्थान काठावर किंवा नगण्य आहे. भारताच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतील अनेक गहन ऐतिहासिक प्रक्रिया विषम प्रमाणात विकसित झाल्या. त्यामुळे हे प्रदेश मागासलेले राहिले. बऱ्याच समाजात स्त्रियांना नानाविध भूमिका वठवाव्या लागतात. त्यांना कमावते असावे लागते, त्यांचे पुरुषांशी नातेसंबंध असतात, त्यांना मुले जन्माला घालावी लागतात. परिवारात आईवडील, पती भाऊ-बहिण, मुले, इतर पुरुषंमडळी आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या समाजातील इतर म्हाताऱ्या व्यक्ती अशा साऱ्यांची त्यांना काळजी घ्यावी लागते. नृत्य हा यातील अनेकांचा पारंपरिक व्यवसाय आहे. दूरदर्शन आणि चित्रपट यांचा वाढता प्रभाव, करारकर्त्यांचा अभाव, परिणामी कमी झालेली मागणी यामुळे लुप्त झाला आहे. संगीतकला अकादमीने नौटंकी कलेतील योगदानासाठी 'नौटंकी क्वीन' म्हणून गौरविलेल्या सुप्रसिद्ध कलावंत गुलाबबाई या बेडिया समाजातील होत्या(५). गरिबीच्या वाढत्या ओझ्याने त्यांचे जीवन संघर्षपूर्ण झाले आहे.

अनेकविध विकसन प्रक्रियांनी घडवून आणलेल्या सामाजिक बदलाच्या धर्तीवर ह्या स्त्रियांना जीवनात दररोजच वेगवेगळ्या अनुभवविश्वात पाय रोवून उभे राहावे लागते. बाजारपूर्व सरंजामशाही रचना आणि मूल्य अशी मागणी करतात की या स्त्रियांची लैंगिकता आणि श्रम यांचा वापर त्यांच्या कुटुंबाच्या देखभालीसाठी उपयोगात यावा. विकासासाठी शिक्षणाची किंवा नोकरीची संधी उपलब्ध करून देण्याऐवजी जेथे त्यांची नृत्यकला मध्यमवर्गाचे मनोरंजन व मद्याच्या वाढत्या मागणीसाठी वापरून घेता येईल अशा संस्कृतीच्या निर्मितीची नवीन क्षेत्रे उपलब्ध करून देत भांडवलशाही विकासाच्या उदयोन्मुख रचनाही तेच करीत आहेत. बारबालांना त्यांच्या मूळच्या ठिकाणी काम सोईस्कर नसल्याने उपरोक्त ठिकाणी जावे लागते आणि तेथे त्यांच्याकडून पैशासाठी आणि शासनाकडून महसूलासाठी त्यांच्या

३) वर्षा काळे यांचे महाराष्ट्राचे राज्यपाल यांना पत्र. http://www.nswp.org/rights/bargirls/letter-governor.html accessed on १३ June २००९

४) वर्षा काळे पत्र, op.cit.

५) गुलाबबाई, सुप्रसिध्द नौटंकी नर्तिका, गायिका आणि अभिनेत्री या बेडिया जातीतील होत्या. त्यांना संगित नाटक अकादमी पुरस्कराने गौरवण्यात आलं होतं. जमातीच्या सांस्कृतिक इतिहासाच्या माहितीसाठी, बघा – गुलाबाबाई-दि क्विन ऑफ नौटंकी थिएटर, लेखक दिप्ती प्रिया मेहरोत्रा, पेंग्विन, २००८

लैंगिकतेचे आणि श्रमाचे सांस्कृतिक सेवांच्या नावाखाली शोषण होते. अशा पार्श्वभूमीवर त्यांच्या लैंगितेचे, नागरिकत्वाचे, लोकशाही आणि मानवी हक्क अशा नानाविध दृष्टिकोनातून असलेल्या धोरणात्मक आणि राजकीय अर्थाचे टिकात्मक परिक्षण न्यायसंस्था, स्त्रीचळवळीतील कार्यकर्त्या, शासन आणि मुख्यत्वे स्वतः त्या मुली ज्या मूलभूत महत्त्वाच्या आहेत त्यांच्या दृष्टिकोनातून करू या.

# न्यायसंस्था

आश्चर्य म्हणजे राज्यशासनाच्या कायद्यातील उणीवा आणि खाचखळणे जस्टिस एफ आय रिबेलो आणि श्रीमती रोशन दळवी या वरिष्ठ न्यायालयाच्या न्यायाधिशांनी उघडकीस आणले. एखाद्या नागरिकाला राज्यशासनाच्या लहरीनुसार चालावे लागेल इतके आपले मुलभूत अधिकार दुबळे आहेत काय असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी बंदीला पुढील दोन कारणांमुळे घटनाबाह्य घोषित केलेः ही बंदी कलम १४ जे समानतेचा हक्क सागते आणि कलम १९(१) (जी) जे मूलभूत हक्क सांगते त्याचे उल्लंघन आहे(६). नर्तिकांची डान्सबारमधील सादरीकरणावरील बंदी ही भेदभावात्मक होती असा निर्णय उच्च न्यायालयाने दिला आणि राज्यशासनाच्या धोरणांमधील सोयिस्कर मतलबीपणाचे तर्कशास्त्र उघड केलेः- स्त्रिया नाचत नाहीत ''तोपर्यंत शासनाला नैतिकतेचे आणि सार्वजनिक मनोरंजनाच्या

---

६) फ्लॅव्हिआ ॲग्निस यांनी या दोन भूमिका त्यांच्या पुढील लेखात विशद केल्या आहेत – 'अ रे ऑफ सुप्रिम होप फॉर बार डान्सर्स' (दि एशियन एज, पुणे ०२/०६/२००६)

१. काही हॉटेल्स आणि क्लब्स यांना दिलेल्या सवलतीचा नैतिक पातळीला अपेक्षित ध्येयधोरणांशी काही सुसंगत संबंध नाही आणि म्हणून ती सूट ही भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ (हे समानतेच्या कायद्याविषयी आहे) नुसार लहरी आणि उल्लंघन करणारी आहे. पंचतारांकित हॉटेल्स, क्लब्स यांना दिलेल्या सवलतीबाबत किंवा अपवादाबाबत न्यायालयाची बाजू अशी. ''जेव्हा भारतीय घटनाकर्त्यांनी कलम १४ लागू करून व्यक्तिची अर्थिक क्षमता किंवा सामाजिक प्रतिष्ठा यानुसारचे भेदभाव नाकारले, त्यावेळी त्यांनी राज्यशासन कोणताही भेदभाव करणार नाही असे त्यातील शब्द अजरामर केले."

२. दूसरी भूमिका अशी होती :-
अशी सवलत किंवा अपवाद म्हणजे बारमालक आणि बारबाला यांना एखादा धंदाव्यवसाय करू देण्याच्या मूलभूत स्वातंत्र्याचे उल्लंघन आहे आणि घटनेच्या कलम १९(१) (जी) चे ही हे उल्लंघन आहे. (हे कलम मूलभूत अधिकाराविषयी आहे) फ्लॅव्हिआ ॲग्निसः- कोर्टाने राज्यशासनाच्या धोरणाचे सोयिस्कर तर्कशास्त्रही उघड केलेः ''शासनाला नैतिकतेचे आणि स्त्रीमहात्म्याचे उल्लंघन वाटत नाही आणि किंवा लोकरंजनाच्या ठिकाणी स्त्रियांची उपस्थिती मानहानिकारक वाटत नाही जोपर्यंत स्त्रिया नाचत नाहीत! शासनाचे बारमधील नृत्यावर बंदी घालण्याचे कारण त्यांच्या मते असे की नृत्यामुळे उपस्थित ग्राहकांत शारिरिक वासना जागृत होते. उपाहारगृहात स्त्रिया गिऱ्हाईकांना दारु किंवा बिअर देतात तेव्हा गिऱ्हाईकांची कामवासना जागी होत नाही. त्या नृत्य करू लागल्या तर मात्र होते का?''

''नाचण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकारातील वाणी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग आहे. असे जर असेल तर ह्या मूलभूत अधिकाराचा व्यावसायिक उपयोग करून घेण्याची नागरिकांना मुभा आहे. मग असा उपयोग बारमालक नृत्यसादरीकरणाद्वारे किंवा बारमधील नर्तिका त्यांच्या स्वतःच्या सर्जनशील कौशल्याचा वापर व्यवसायासाठी करून घेऊ शकतात. दुसऱ्या शब्दांत, उपजीविकेसाठी स्वतःच्या कौशल्याचा वापर करत असतील तर...'' (फ्लॅव्हिआ ॲग्निस यांच्या 'अ रे ऑफ सुप्रिम होप फॉर बार डान्सर्स मधील उदाहरण, (A.A. ०२/०६/०६)

ठिकाणची स्त्रियांची हजेरी अवमानकारक वाटत नाही, स्त्रीमहात्म्याचे उल्लंघन वाटत नाही शासनाचे बारमधील नृत्यावर बंदी घालण्याचे कारण त्यांच्या मते असे की नृत्यामुळे उपस्थित ग्राहकांची शारिरिक वासना जागृत होते. स्त्रिया ग्राहकांना जेवतांना मद्य किंवा बिअर देतात तेव्हा ग्राहकांची वासना जागृत होत नाही मात्र स्त्रियांनी नृत्य केले तर पुरुषांची वासना जागृत होते का ?

''नाचण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकारातील वाणी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग आहे. असे जर असेल तर ह्या मूलभूत अधिकाराचा व्यावसायिक उपयोग करून घेण्याची मुभा नागरिकांना आहे मग असा उपयोग बारमालक नृत्यासादरीकरणाद्वारे किंवा बारमधील नार्तिका त्यांच्या स्वतःच्या सर्जनशील कौशल्याचा वापर करत जर अर्थार्जन करत असतील तर...''(७)

उच्च न्यायालयात केलेल्या युक्तिवादात शासनाचा वर्गाबाबतचा झुकता पूर्वग्रह उघड होता. न्यायालयात शासनातर्फे फली नरीमन आणि हरीश साळवे यांच्यासारख्या ज्येष्ठ वकीलांनी काम पाहिले डान्सबारचा वेश्याव्यावसायिकांशी आणि कायदा आणि सुव्यवस्थेच्या समस्यांशी त्यांनी संबंध जोडला. बारबालांच्या नृत्यासादरीकरणावर बंदी घालून त्यांना उपजीविका नाकारता येणार नाही असा विचार ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग, सोली सोराबजी, मुकुल रोहतगी, राजीव धवन यांनी मांडला व शासनाच्या युक्तिवादाचा विरोध केला(८). सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिश मंडळाने (न्यायमूर्ती बी.ए. अग्रवाल आणि न्यायमूती पी.पी. नवलेकर) नमूद केले की डान्सबारना असभ्य नृत्य सादरीकरण करता येऊ शकत नाही आणि शासनाने ठरवून दिलेल्या नियमांना बळकटी आणत त्यांना फक्त भारतीय नृत्य शैलीनुसार सादरीकरण करण्याची परवानगी आहे(९). हे नमूद करणे मनोरंजक ठरेल की जेव्हा वरील कारणांनी डान्सबारवर बंदी घातली होती तेव्हा स्त्रियांची सेवा देणाऱ्या बार, पब्स व डिस्कोथेक्स, तसेच तीन तारांकीत आणि पंचतारांकीत हॉटेल्समधील नृत्याची 'संस्कृती आणि पर्यटनाला प्रोत्साहन' अशी व्याख्या करून त्यास परवानगी देण्यात आलेली होती. ही वेगळी गोष्ट आहे का की 'ध्वनीफितीवर भारतीय शैलीतील नृत्य' 'सभ्य' म्हणून गणलं जाऊ शकतं आणि हिंदी चित्रपट गीतांच्या तालावरील नृत्य 'असभ्य' ठरते, जेव्हा तीच गाणी चित्रपटात दाखवण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. शासनाला पाठिंबा असलेल्या विचारधारा आणि त्यांचे राष्ट्र, राष्ट्रीयता, कुटुंब आणि संस्कृती या विषयी उजव्या पुरुष प्रधान विचारधारेशी सख्य, यांच्या अभ्यासातून वरील प्रश्नांपैकी काहींची उत्तरे मिळू शकतील.

---

७) फॅव्हिआ अग्निस यांच्या 'अ रे ऑफ सुप्रिम होप फॉर बार डान्सर्स' मधील उद्धरण (A.A. ०२/०६/०६)

८) नॅशनल हेराल्ड, ११ मे २००६

९) नॅशनल हेराल्ड, ११ मे २००६

# राज्यशासन आणि त्याचे सांस्कृतिक राजकारण

राज्यशासनाने पुढीलप्रमाणे समीकरण सादर केले – बारबालांचे नृत्य = अंधकारमय वासना आणि घाणेरडेपणा = अनैतिकता = वेश्याव्यवसाय = AIDS = निकोप कुटुंबाचा विध्वंस, जसे गृहमंत्री श्री.आर. आर. पाटील यांच्या विधानांतून दिसून येते. डान्सबार महाराष्ट्रीय समाजाच्या नैतिक आणि सांस्कृतिक संरचनेला उध्वस्त करत आहेत, असे म्हणत त्यांनी बंदीचे समर्थन केले, 'हे म्हणजे नैतिक वचक ठेवणे आहे' या आरोपाचे खंडन करत ते म्हणाले, ''कायदा आणि सुव्यवस्थेच्या समस्या निर्माण करत जर शेकडो परिवार कशाने उध्वस्त होत असतिल, तर शासनाने हस्तक्षेप केलाच पाहिजे. जनतेसाठी आमचे काही उत्तरदायीत्त्व आहे; काही चूक झाली तर आम्हाला जबाबदार धरले जाते(१०).

या युक्तिवादातील चुकीचे गृहीत असे आहे की महाराष्ट्रातील समाजात मनोरंजनासाठी स्त्रियांचे नृत्य जणू कधी अस्तित्वातंच नव्हते. प्रगल्भ असा लोकनाट्य किंवा तमाशा हा मनोरंजन प्रकार महाराष्ट्रात खूप प्रसिद्ध आहे. त्यात खालच्या जातीच्या (जसे महार आणि मांग) नर्तिका नृत्य आणि लावणीगीते सादर करतात. मंत्रीसाहेबांना एकाएकी सांस्कृतिक स्मृतिभ्रंश कसा झाला याचे कुणालाही आश्चर्य वाटेल वामन कर्डक, विठ्ठल उमप, विठाभाऊ नारायणगावकर, यमुना-तारा-हिरा-वाईकर अशा अनेक कलावंताना राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवण्यात आलेले आहे. लावणी कलावंत हे नेहमीच शोषित अशा खालच्या जातीतून आलेले आहेत. ब्राह्मण/वरिष्ठ जाती वर्गांनी 'भ्रष्ट वासना व घाण' आणि मनोरंजनाचा नीच प्रकार असे समजत तमाशाला कमी लेखले आहे. राज्याशासन आणि मंत्रीसाहेबांनी ब्राह्मणी दृष्टिकोनातून लोककलांचा संपूर्ण सांस्कृतिक इतिहासच एकाअर्थी नाकारला. ह्याचा अर्थ असाही आहे की खालच्या जातींचे शोषण व त्यांच्यावरील दबाव तसेच त्याची सर्जनशीलता व अभिव्यक्ती यांचा गुंतागुंतीचा इतिहास दृष्टिआड करणे. प्रमाणभूत पुरुषप्रधान ब्राह्मणी कुटुबांच्या व्याख्येनुसार महाराष्ट्रीय समाजजीवनासाठी एक आणि एकच सुसंबद्ध नैतिक आणि सांस्कृतिक मार्ग आहे, असा आग्रह उजव्या पक्षांच्या सांस्कृतिक कार्यक्रमपत्रिकेनुसार चालणाऱ्या राज्यशासनाच्या ब्राह्मणी धोरणाचा आहे. या पीडित स्त्रिया त्यांच्या कुटुंबात, जी ब्राह्मणी कुटुंबापेक्षा अगदी भिन्न आहेत, ज्या नानाविध भूमिका पार पाडतात त्याकडे सामाजिक अभ्यास करताना राज्यशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. उच्च जाती आणि मध्यम वर्ग यांच्या परिवाराची प्रतिकृती असलेल्या परिवारातील स्त्रियांच्या संगोपनाच्या भूमिकेवरच (Women's Nurturing Role) फक्त राज्यशासनाने जोर दिला. परंतु परिवार ही काही न बदलणारी वैश्विक रचना नाही. विस्तीर्ण सामाजिक चौकटीत आणि निर्मितीच्या विशिष्ट संबंधात त्याचे स्थान आहे. जेव्हा सामाजिक मुद्यांवरून संघर्ष पेटतो तेव्हा होणाऱ्या बदलांची झळ सर्वसामान्यपणे खालच्या वर्गातील परिवारांना जास्त पोहोचते. या मुलींच्या दुरावस्थेवरून हेच स्पष्टपणे दिसून येते.

कुमार केतकर यांच्या निरीक्षणानुसार(११) महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच सांस्कृतिक राष्ट्रवादी संघपरिवार आणि स्वत:ची शैली असणारे उदारमतवादी लोकशाहीवादी यांनी समाजातील नवीन नैतिक पद्धतीसाठी हातमिळवणी केली. त्यांच्या व्याख्येनुसार

१०) इंडियन एक्सप्रेसमधील वृत्तानुसार, पुणे २३.०४.२००५

११) कुमार केतकर इंडियन एक्सप्रेस, पुणे, २३.०४.२००५

'संस्कृतिचे' रक्षण करण्याच्या बहाण्याने विविध भगव्या अनुयायी संघटनांनी स्त्रिया, गरीब आणि खालचे वर्ग यांना लक्ष्य बनवणाऱ्या आक्रमक मोहिमा आयोजित केल्या. सुषमा स्वराज यांनी एका फॅशन वाहिनीला बंद करण्याची धमकी दिली. शिवसैनिकांनी वेश्यांना मारहाण केली आणि मुंबईतल्या 'अनैतिक जागा' उध्वस्त केल्या. अभाविप कार्यकर्त्यांनी स्कर्ट घालणाऱ्या बडोद्यातील मुलींना धमकावले. अलीकडे मंगलोरला बारमध्ये जाणाऱ्या मुलींना श्रीराम सेनेने मारहाण केली. काही वर्षापासून व्हॅलेंटाईन डे च्या दिवशी तरुण मुलामुलींना भगव्या गटाकडून पद्धतशीरपणे त्रास दिला जात आहे. सांस्कृतिक विविधतेचे समाजाच्या एका ठोकळेबाज कल्पनेत रूपांतर करण्याचा प्रयत्न राज्यशासन करत होते असा युक्तिवाद प्रगतीशील महिलांच्या संघटनांनी केला. राज्यशासनाच्या आरोपाचे खंडन करण्यासाठी SNDT महिला अभ्यासकेंद्राने मुंबईत पाचशे बारबालांचा अभ्यास केला आणि पुढील प्रमाणे युक्तिवाद मांडला :-

पाटील यांचा प्रयत्न म्हणजे या देशाला आकार देणाऱ्या सांस्कृतिक विविधतेचे रूपांतर समाजाच्या एका ठोकळेबाज कल्पनेत करणे असा आहे. गरीबांना शहरातून दूर करावे मग ते झोपडपट्टीत काम करणारे असोत किंवा डान्सबारमध्ये काम करणाऱ्या महिला असोत, अशी राज्यशासनाची कार्यक्रमपत्रिका आहे हे उघड आहे. शासन परस्परविरोधी भूमिका घेत आहे. एका बाजूने बार मध्ये काम करणाऱ्या स्त्रियांचा लैंगिक छळ आणि दुसऱ्या बाजूने युवक आणि समाजाला नितीभ्रष्ट करण्याचा आरोप. नैतिकता ही प्रबळ आणि विशेष अधिकार असलेल्या समाजातील गटावरून ठरविता येत नाही. राज्यशासन आम्हा स्त्रियांच्या चिंतेची कारणे किंवा आमच्या वास्तवाला समोर न ठेवता स्त्रीचळवळीची भाषा वापरत आहे... स्त्रियांचा लैंगिक छळ होणार नाही आणि त्यांच्या अधिकारांचे रक्षण होईल, अशी परिस्थिती आणि ठिकाणे निर्माण करण्याऐवजी राज्यशासनाने त्यांच्या उपजीविकेलाच लक्ष्य बनवले आहे. उपजिविकेचा त्यांचा मार्ग कदाचित त्यांना स्वायत्तता आणि त्या अनुषंगाने स्वातंत्र्य देऊ शकेल. त्यांचा अधिक छळ होईल, पिळवणूक होईल अशी परिस्थिती राज्यशासन निर्माण करत आहे(१२).''

त्या मुलींच्या नागरिकत्वाचे हक्क पद्धतशीरपणे काढून घेतले जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि शिवसेनेच्या नेत्यांनी (शिवसेनेच्या विधिमंडळ सदस्या निलम गोऱ्हेसहित) बारबाला या विदेशी (बांग्लादेशी) आहेत, असा आरोप केला आणि श्री.आर.आर. पाटील यांनी त्यांचीच री ओढली. या मुली विदेशी आहेत असे कारण दाखवून त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी शासनाची नाही असे ते पहिल्यांदा म्हणाले. नंतर या बारबाला 'परप्रांतिय' (इतर राज्यांतील) आहेत असे सांगत फक्त चार टक्के महाराष्ट्रींय बारबालांसाठी पुनर्वसन पॅकेज तयार केले जाईल अशी घोषणा त्यांनी केली. फार झाले तर त्यातील काही होमगार्ड म्हणून काम करू शकतात असे म्हणत त्यांनी शेवटी जाहीर केलेले पुनवर्सन पॅकेजही नाकारले. कामकरी वर्गाच्या, खालच्या जातीच्या स्त्रियांचे नागरिकत्व आणि अस्मिता कशा पुसून टाकल्या जात होत्या हे कुणालाही सहज दिसून येते. फक्त मध्यमवर्गीय उच्चजातीय स्त्रिया नागरिक आहेत, त्यांचा जीवनमार्ग 'शुद्ध आणि नैतिक' ठरतो, त्यांच्या कल्याणाला सर्वाधिक महत्त्व आहे आणि बारबाला या 'दुय्यम' किंवा परक्या होत्या. अकलंकित, शुद्ध, नैतिक अशा मध्यमवर्गीय उच्च जातीच्या स्त्रियांसाठी आणि पुरूषप्रधान मूल्यांसाठी अशा या बारबाला धोकादायक मानाल्या गेल्या, तशा चित्रित केल्या गेल्या. हे म्हणजे

---

१२) मुंबईतील स्त्रियांचे गटः (आवाज-इ-निस्वान, अक्षरा, CEHAT(सेहत), एकता, एक्स्प्लोरेशन्स जागोरी, जनस्वास्थ्य अभियान, लॉयर्स कलेक्टिव्ह, मजलिस, LABIA, राही, रिसर्च सेंटर फॉर विमेन स्टडिज, SNDT विमेन्स यूनिव्हर्सिटी, सहेली, सख्या, समा, सोफिया सेंटर फॉर वूमिन्स स्टडीज ॲन्ड डेव्हलपमेंट, स्वयम, VACHA F.ह्यूमनस्केपमध्ये, मुंबई, मे २००५, पान क्र. २४)

अनेक वर्षापासून मुंबईत राहत असलेल्या कित्येक बारबालाना दुय्यम किंवा परक्या ठरवून नागरिकत्त्वाच्या हक्कापासून पूर्णपणे वंचित करण्यापलीकडे काही नव्हते.

विकसाच्या नवीन आर्थिक प्रक्रियेतील वंचित जमातीच्या दरिद्रीकरणाचे विवादास्पद मुद्दे, परिणामतः अधिक शहरीकरण झालेल्या वस्त्यांमध्ये त्यांचे स्थलांतर, ग्रामीण भागातील लोकांचा महानगरात येणारा लोंढा, स्थलांतरामुळे गरीबांचे झालेले विस्थापन, इत्यादी, हे सारे म्हणजे जागतिकरणानंतरच्या 'विकास' प्रक्रियांचा परिपाक आहे. शासनाच्या सांस्कृतिक शुद्धीकरणाच्या कार्यक्रमातून जेव्हा बारबालांना वंचित केले जाते तेव्हा त्यांची लैंगिकता शासनासाठी सर्वकाही जे ओंगळ, अशुध्द, नितीभ्रष्ट, वाईट आहे त्यांचे प्रतिक बनते. तेव्हाच त्यांची लैंगिकता शासनासाठी कायदा आणि सुव्यवस्थेच्या समस्येचे मूळ ठरते.

महीला राज्य आयोग एक सनदी आणि स्वतंत्र संस्था जी अखिल स्त्रीजातीच्या भल्यासाठी व्रतबध्द आहे, तिनेसुद्धा शासनाच्या कार्यक्रमपत्रिकेमधील मध्यमवर्गीय कुटुंबाची 'तथाकथित शुद्धता' प्रकाशात आणत राज्यशासनाची बाजू घेतली. त्यांचा युक्तिवाद असा की बारबालांचे नृत्य दुसरे काही नसून ते वासनेच्या पर्यटनाला देहविक्रय आणि देहव्यापाराला प्रोत्साहन आहे. श्रीलंका आणि थायलंड यासारख्या देशात असेच झाले आणि हजारो कुटुंबाची नैतिकता धुळीला मिळाली(१३). काही स्त्रीसंघटनांनी ही राज्यशासनाची बाजू घेत बारबालांच्या नृत्याची तुलना देहविक्रितून यातना भोगत असलेल्या अल्पवयीन मुलींशी केली. त्यांच्यामते बारमधील नृत्य मानवी अधिकाराचे उल्लंघन असून हजारो अल्पवयीन मुली ज्यांना नाईलाजाने बारमध्ये नाचावे लागते व ज्या मुली व्यावसायिक लैंगिक छळाच्या आणि देहव्यापाराच्या भक्ष्यस्थानी पडल्या व ज्या पडणार आहेत, त्यांच्यावरील अत्याचारांचा अंत करण्यासाठी हे एक प्रमुख पाऊल होते. त्यांच्या मते व्यावसायिक लैंगिक छळ आणि देह व्यापार हे सामान्यपणे मूलभूत मानवी हक्काचे आणि विशेषतः बाल हक्कांचे उघडउघड उल्लंघन आहे(१४). परंतु महीला राज्य आयोग नव्हे तर स्त्रीसंघटनानीही असा

---

१३) स्टेट विमेन्स कमिशनने केलेला युक्तिवादः- ''करोडो रूपयांची उलाढाल असलेल्या या उद्योगजगताने उध्वस्त केलेल्या अगणित कुटुंबाचे काय? त्यांचा युक्तिवाद असा : पुरूष त्यांची मिळकत दारू आणि शरीराची भूक भागविणे यांवर केव्हा खर्च करतात? मद्यपी नवऱ्याकडून मारझोड होऊन घरातच खितपत दु:ख भोगणाऱ्या स्त्रिया ज्यांचे आयुष्य स्वत:च्या दारूडया किंवा नैतिक ऱ्हास झालेल्या पालकांनी उध्वस्त कलं आहे, अशी मुले यांच्या अश्रूंना किंमत नाही. ते पिण्याचे ठिकाण आहे बार ही नाचण्याची आणि बारमध्ये नाचण्याचा घटनात्मक अधिकार नाही. जर ही नोकरी असेल तर श्रमिकांचे कायदे कुठे आहेत? बारमालकांनी त्यांच्या नोकरांप्रत कोणती जबाबदारी उचलली आहे? विशाखा केसमधील कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरूद्ध सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या निर्देशांचे पालन बारमध्ये होत आहे का? कलावंत सभागृहात सादरीकरण करू शकतात आणि उपजीविका मिळवू शकतात. परंतु ज्यांना स्त्रीदेहाला बाजारी वस्तू बनवायचे आहे, असे लोक पुरूषांच्या वासनेसाठीच्या वस्तू म्हणून त्यांना डान्सबारमध्ये नाचवतील. हे स्त्रियांच्या प्रतिष्ठा आणि गौरवाच्या विरोधात आहे. भारत CEDAW चा सदस्य आहे, ते स्त्रीदेहाच्या बाजारी करणाला प्रतिबंध करतात. स्त्रियांनी काम करावे परंतु आम्हाला उत्पादनक्षम कामावर समाज उभारायचा असून घाणरडेपणावर नाही... आम्हाला देशासाठी हव्या असलेल्या विकासाच्या आराखड्याचे परीक्षण आम्हाला करायचे आहे. श्रीलंका आणि थायलंड सारख्या देशांनी केलेल्या चुका धोरणे ज्यांचा परिणाम होऊन तेथे सेक्स पर्यटन विकसित झाले ते देश आता त्या चुका दुरूस्त करू पाहत आहेत. आम्हाला त्या टाळावयाच्या आहेत... डान्सबारला परवानगी म्हणजे देहविकण्याला आणि देहव्यापाराला प्रोत्साहन देण्यासारखे आहे... कामाठीपूरा येथील पिंजरे आपल्या समाजासाठी कलंक आहेत परंतू ते काही डान्सबारचे समर्थन होऊ शकत नाही'' दि एशियन एज, ०३.०९.२००६

१४) श्रीमती प्रिती पाटकर 'प्रेरणा'तून, इंडियन एक्सप्रेसमधून, २५-०४-२००५, त्या म्हणाल्या: ''हे पाऊल म्हणजे केवळ भ्रष्ट करणारे आणि गुन्हेगारी प्रभाव जे युवकांमध्ये झपाट्याने वाढताहेत त्यांना कह्यात आणणे नव्हे तर अल्पवयीन मुलींच्या अधिकाराची होत असलेली पायमल्ली थांबवण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. अल्पवयीन मुलींना बारमध्ये नाचवले जाते तेव्हा त्या मुली देहविक्रय आणि देहव्यापाराच्या संभाव्य आणि प्रत्यक्ष बळी ठरतात. देहविक्रय आणि व्यापार हे सामान्यपणे मानवी अधिकारांचे आणि विशेषतः बाल हक्कांचे स्पष्ट उल्लंघन आहे. त्यांनी पुढे सुचवले; गरजू मुलींसाठी पुनर्वसन पॅकेजची विस्तृत आखणी करून त्यांची अंमलबजावणी करणे.

प्रश्न कधी विचारला नाही की छगन भूजबळ हे त्याच सत्ताधारी पक्षाचे मंत्री आहेत, तरी त्यांनी डान्सबारला प्रथम परवानगी का दिली होती, असा प्रश्न फ्लेव्हिआ ॲग्निस यांनी विचारला. ''महीला राज्य आयोगासाठी मद्यातिरेक आणि नैतिक ऱ्हास फक्त नृत्य असेल तेव्हाच होतो का आणि इतरवेळी नाही का? महीला राज्य आयोगला बारमध्ये मद्यप्राशन करायला आडकाठी नाही. नृत्य AIDS चा प्रसार कसे करू शकते जर खुद्द देहव्यापार तसा प्रसार करत नाही? महीला राज्य आयोग वेश्यावस्तीतील देहविक्रय बहुतकरून चालवून घेत(१५).

# उपेक्षित स्त्रियांचा आवाज

वादविवादात दोन प्रमुख मुद्दे समोर आले, ते असे : डान्सबार हा एक प्रकारचा देहविक्रय आहे का आणि देहविक्रय एक 'व्यवसाय' आहे का ज्यात मुलींची लैंगिकता हे कमाईचे साधन असते. प्रसारमाध्यमांनी घेतलेल्या मुलाखतींमध्ये अनेक बारबालांनी त्यांच्या कामाची तुलना देहविक्रयाशी केली जात असल्याचा निषेध केला आणि भीती व्यक्त केली की ही बंदी कदाचित त्यांना देहविक्रयासाठी उद्युक्त करेल. बारमधील काम हे लैंगिक काम आहे आणि बारबालांना हे काम निवडण्याची लोकशाहीत मुभा आहे, असा युक्तिवाद काही स्त्रीवादी व्यक्तिंनी भूतकाळात मांडलेला आहे. हया युक्तिवादावर दलित साम्यवादी बहुजन स्त्रियांच्या बाजूने प्रखर टिका झाली. त्यांच्या म्हणण्यानुसार डान्सबार हा एक लैंगिक मनोरंजन उद्योग होता आणि बाजार अर्थशास्त्राचा अपरिहार्य भाग म्हणून तो उदयाला आलेला होता. त्यांच्या म्हणण्यानुसार बाजार अर्थशास्त्रात स्त्रियांच्या लैंगिक कार्यक्रमाचा आणि श्रमाचा उपयोग त्यांच्या नृत्यातील हावभावांद्वारे करून घेतला जातो(१६). त्यांच्या युक्तिवादानुसार डान्सबार नवीन स्वरूपात जातीप्रथेला बळकटी देणाऱ्या प्रवाहाचे प्रतिनिधित्व करतात. या प्रक्रियेत खालच्या जातीच्या स्त्रियांना बाजारातील शोषण करणाऱ्या रचना चक्रात ढकलले जाते. या कारणांनी त्यांनी बंदीचे समर्थन करत सर्वसमावेशक अशा लैंगिक मनोरंजन नियमन विधेयकाची मागणी केली.

श्रीमती वर्षा काळे, बारबालांच्या नेत्या आणि स्त्रीवादी पक्षाच्या संस्थापक, यांनी डान्सबारच्या माध्यमातून स्त्रीदेहाचा व्यापार आणि समाजातील वाढत्या हिंसाचारावर त्यांचा अप्रत्यक्ष प्रभाव, हे मुद्दे हाती घेतले. वर्षा काळे यांनी या मुलींच्या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधत राज्यपालांना एक विस्तृत निवेदन सादर केले. त्यात त्या म्हणतातः–

''जर पाटील यांना स्त्रीव्यापाराविषयी खरोखरंच चिंता वाटत असेल तर ते मुंबईतील तीन हजार दलालांना अटक का करत नाहीत? ती न झाल्यामुळे स्त्रिया पुन्हा वेश्यावस्तीत ओढल्या जात आहेत... बारमध्ये कोणताही देहविक्रय होत नाही. मी याबाबत अभ्यास केलेला आहे... जास्तीत जास्त बारबाला या पारंपरिक नाचगाणी करणाऱ्या जमातींतून येतात, जेथे स्त्रियांनी लग्न करणे अपेक्षित नसते, मुलांना त्या इतर मार्गांनी जन्म देऊ शकतात. तसेच परिवारिक गरजा त्यांनी नृत्यांद्वारे भागवणे अपेक्षित असते... ज्या प्रौढांची संमती असते त्यांच्याशीच ह्या स्त्रिया संबंध ठेवतात... यात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची नीतिमुल्ये धोक्यात का यावीत?''

१५) फ्लेव्हिआ ॲग्निस एशियन एजमध्ये, ०४-१०-२००५.
१६) कुंदा प्रमिलाना, डान्सबार बंदीवरील वादविवाद सत्र – MAFUA स्टॅण्ड पॉइंट, दलित बहुजन महिला विचार मंच प्रकाशन, विनादिनांक

बारबाला खरोखरंच जर देहव्यापाराच्या बळी ठरल्या असतील, तरी राज्यशासन आणि भाजप, शिवसेनेसारखे पक्ष ज्याप्रमाणे दावा करतात, त्याप्रमाणे त्याची तुलना देहविक्रयाशी करणे हे चुकीचे ठरेल. हिंदी चित्रपट, प्रतिगामी सामाजिक विचारधारा, चित्रपटांत आणि दूरदर्शन मालिकांत दाखवल्या जाणाऱ्या सांस्कृतिक गोष्टी यांच्यावर बंदी घालण्याचा त्यांनी कधी विचारही केलेला नाही. एकूणच लैंगिकतेच्या बाजारातील अर्थशास्त्राकडे हे वेचक सांस्कृतिक धोरण दुर्लक्ष करते.

# जागतिकीकरण निर्मित अनिश्चिततेच्या वातावरणातील राज्यशासन

हे घटनाचित्र केवळ भारतातीलच नाही तर सबंध दक्षिण आशियातील आहे. परंपरागत मध्यमवर्ग, धार्मिक नीतिमुल्ये आणि मूलतत्त्ववादी / पुरूषसत्ताक विचारधारा या दक्षिण आशियाभर सर्वत्र पसरलेल्या आहेत आणि त्या स्त्रियांना पुरूषसत्ताक, उच्चवर्ग / उच्च जातीच्या विचारधारेत आणि उच्चवर्गाच्या नीतिमूल्यांत ढकलत आहेत.

तरीसद्धा खालच्या जातीच्या मुलींच्या लैंगिकतेबाबत एवढया जबरदस्त भीतीचे कारण काय आहे? त्यांची लैंगिकता धोकादायक का वाटते? हा भयगंड कुठून निर्माण होतो? प्रथमतः म्हणजे उच्च जाती आणि वर्गानी ठोकळेबाज आणि शुद्ध संस्कृतीच्या विचारांनी का भारलेले असावे?

कदाचित ह्या प्रश्नाला उत्तर द्यायचा एक मार्ग म्हणजे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा आणि या प्रक्रियेत वर्चस्व गाजवणाऱ्या नानाविध घटकांची भूमिका यांचा अभ्यास करणे, हा होय. उदा – अलीकडच्या अहवालांनी दर्शवले आहे की भारताने स्त्रिया व मुलींचा देहव्यापार बंद करण्यासाठी ठोस सक्रिय भूमिका घेतली नाही तर अमेरिका दंडात्मक कार्यवाही करू शकते(१७). ह्या दटावणीने बहुतेक नुसते नावापुरते का होईना शासनाला डान्सबार बंद करायला उद्युक्त केले असावे. त्यामुळे आंतरराष्ट्रिय स्तरावर खबर गेली की देहव्यापार रोखण्यासाठी ‘ठोस कृती’ करण्यात आली आहे. वस्तुतः, दलालांविरूद्ध अशी कुठलीही कृती करण्यात आलेली नाही. आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी व जागतीक बँकेच्या नियमांनुसार ‘सुशासनाच्या व्याख्येवर आधारित नवीन नमुना उदयास येत आहे असे वाटते. आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी व जागतीक बँकेच्या नियमांचे पालन करण्यावर त्यांनी शासनाला दिलेली मदत मिळणे असते. हे सुचविते की राज्य / राष्ट्रिय स्तरावर धोरणे बनविण्याचे राज्यशासनाचे अधिकार कमी केले जात आहेत. आपल्या कल्याणकारी योजनांच्या बांधिलकीपासून माघार घेण्यासाठी राज्यशासनावर दडपण आणले जात आहे. आरोग्यसेवा, पाणी, अन्नधान्यावरील सवलत, ग्रामिण नोकऱ्या यांच्यावरील खर्च कमी करण्यात आला आहे, त्यावरून हे स्पष्ट दिसते. अभ्यासाअंती दिसून आले आहे की जरी ही ‘कल्याणकारी’ बांधिलकी राज्यशासनाने सोडून दिली तरी भांडवलदारांच्या बाजूने मध्यस्थी करून शासन गुंतवणूक आणि उत्पादनाला उपयुक्त असे वातावरण पुरविणे व ते कायम राखणे चालू ठेवणार(१८). एक बाजूने देशात भांडवलाचे आगमन आणि गमन यावर राज्यशासनाचा

१७) दि हिंदूमधील अलिकडचा वृत्तांन्त, दि.१७ जून दर्शवतो की भारत बालशोषण आणि स्त्री अधिकारांचे उल्लंघन याचा केवळ बघ्या देश असून तो हे सगळे थांबवू शकत नाही.

१८) CF.P. पटनाईक, दि रिट्रीट टू अनफ्रिडम : एसेस ऑन दि इमर्जिंग वर्ल्ड ऑर्डर, तुलिका, नवी दिल्ली, २००३१९

वचक जवळजवळ नाही, आणि दुसऱ्या बाजूने ते गरजू नागरिकांप्रति जबाबदाऱ्या पार पाडण्यात फार असमर्थ ठरत आहे. असंघटित क्षेत्रात ढकलला जाणारा स्त्रियांचा वाढता लोंढा, त्यांची वाढती गरिबी यावरून हे पुरेसे उघड झालेले आहे(१९).

अप्पादुराई (२००७) यांचे म्हणणे आहे की – जागतिकीकरणाच्या वातावरणात सार्वभौम आणि स्थिर शासनाच्या कल्पना ओघानेच येतात, तसेच 'आम्ही' विरूद्ध 'ते' यांमधील तथाकथीत 'राष्ट्रिय' चारित्र्याची हानी याविषयीच्या चिंता आणि असुरक्षिततेच्या भावना विकोपास जातात. याचा परिणाम म्हणून सांस्कृतिक शुद्धीकरणाच्या नवीन प्रेरणांची निर्मिती होते. उच्च वर्ग / जातीची नीतिमूल्ये राष्ट्राचा पाया होतात. असेच घडते आहे. सामाजिकदृष्ट्या वंचित आणि उपेक्षित स्त्रिया या, पुरुषसत्ताक हिंदू उच्च जाती / वर्गाच्या कुटुंब संकेतांतून निर्माण झालेल्या निश्चित (भ्रामक) ओळखीसाठी धोकादायक समजल्या गेल्या आहेत. नृत्याला वासनाकर्माशी जोडले जाते आणि मुलींचा निषेधाचा आवाज दडपला जातो. बारबालांची दुहेरी पिळवणूक आणि त्यांच्याबाबतीतील हिंसा ही स्त्रीजातीच्या अकलंकीत आणि शुद्धत्वाच्या पुरूषप्रधान भ्रमास टिकवून ठेवण्यास मदत करते. उदरनिर्वाहाचे एकमेव साधन उरल्याने बारबालांना देहविक्रय करण्यास भाग पडते आणि पुरुष ग्राहकांचे विशेषधिकार तसेच अबाधित राहतात. बारबालांच्या संबंधी या प्रबळ संकल्पना निर्मितीमुळे त्यांच्या 'कामाच्या आवडीनिवडी' बाबतच्या बळजबरीविषयीचे प्रश्न सहजपणे पुसून टाकले जातात.

अशा प्रकारे ग्राहकानुवर्ती वातावरणातील, उपेक्षित स्त्रियांबाबत वाढत चाललेली हिंसा, सांस्कृतिक क्षेत्रातील समाजकल्पना आणि असंवेदनशीलता यांच्याकडून स्वीकारार्ह बनविण्यासाठी दुर्बल शासन आणि प्रतिगामी राजकीय विचारधारा उजव्या पुरुषसत्ताक विचारधारांशी हातमिळवणी करतात. ज्या प्रसारमाध्यमांच्या भूमिकेची जागतिकीकरणाची पाठराखण करणाऱ्या विचारवंतांनी खूप प्रशंसा केली आहे, त्या माध्यमांच्या प्रसारणात स्त्रियांना फक्त उत्तान देहप्रदर्शन करण्यापलीकडे स्थान नाही. उद्योगजगत स्त्रीचित्रपट तारकांचा उपयोग प्रसारमाध्यमांमध्ये त्यांच्या उत्पादनांची जाहिरात करण्यासाठी करतात, परंतु खालच्या जातीच्या स्त्रियांची दुरावस्था मात्र त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर राहते.

दक्षिण आशियाच्या काठावर असलेल्या स्त्रियांच्या बाबतीत काय घडते आहे त्याच्या संदर्भात ही संपूर्ण घटना बसवून, समजून घेतली पाहिजे. महाराष्ट्रातील खैरलांजी प्रकरण(२०) जेथे विशेषत: स्त्रियांनी तथकथित मर्यादांचे उल्लंघन केल्यामुळे संपूर्ण दलित परिवाराची पाशवी हत्या करण्यात आली होती किंवा पाकिस्तान आणि भारतातील काही जमातीतील 'प्रतिष्ठेसाठी हत्या'(२१) किंवा तालीबान राजवटीतील अफगाण स्त्रिया, किंवा मलेशियातील घरकाम करणाऱ्या इंडोनेशियन मुलींच्या व्यथा इ. प्रकरणे महत्त्वाची आहेत. आज 'विकासाच्या' (हा सर्वासाठी परवलीचा शब्द झाला आहे) दाव्यांचा आणि वंचित गटातील स्त्रियांविरुद्ध वाढता हिंसाचार यांच्यामध्ये दर्शनीय परस्पर विरोधाभास आहे. आर्थिक धोरणे, हिंसा आणि मूलतत्त्ववाद यांच्यातील परस्परसंबंध जरी गुंतागुंतीचे असले तरी त्यांच्याकडे काणाडोळा करणे कठीण होईल. स्त्रीवादी राजकारणासाठी हे महत्त्वाचे

१९) AIDWA डॉक्यूमेंट

२०) अर्जन अप्पादुराई, फिअर ऑफ स्मॉल नंबर्स : ॲन एसे ऑन दि जिओग्राफी ऑफ अँगर, सिगल बुक्स, २००७, ड्यूक युनिव्हर्सिटी प्रेसद्वारा प्रथम प्रकाशित,२००६

२१) आनंद तेलतुंबडे

आहे. मेनन (२००७) म्हणतात(२२) – स्त्रीची ओळख ही आता समस्येवाचून करताच येणार नाही. उपेक्षित स्त्री हाच स्त्रीवादी राजकारणाचा वस्तुविषय असला पाहिजे. उपेक्षित स्त्रीच्या दृष्टिकोनातून सांस्कृतिक अस्मितेचा प्रमुख स्त्रोत म्हणून उदयाला येणाऱ्या पुरुषसत्ताक कुटुंब पद्धतीला जाब विचारला गेला पाहिजे. स्त्रियांच्या चळवळीपुढचे राजकीय काम नानाविध स्वरूपाचे आहे. 'परिवारांच्या' आकलनाचा आवाका वाढवणे, खालच्या जातीच्या स्त्रियांच्या लैंगिकतेचे नमुनेदार आणि तथाकथित पुरोगामी आकलन दोन्हींना आवाहन देणे आणि ते बदलणे, उपेक्षित स्त्रियांच्या नागरिकत्वाच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी राज्यशासनावर दबाव आणणे, सुरुवात म्हणून दक्षिण आशियातील स्त्रीवादी चळवळींशी नाते जोडणे. बंदी, उणीवा, दबाव आणि पद्धतशीर वंचितीकरण जे जागतिकीकरणाच्या आणि बाजार अर्थशास्त्राच्या वातावरणात भरपूर प्रमाणात असलेल्या बंदी घालणे, फटी पाडणे, बाजुला सारणे आणि गप्प बसविणे, या सगळ्यांकडे लक्ष वेधून घेणे ही त्यादिशेने पहिली पायरी म्हणता येईल.



२२) मेनन, निवेदिता, संपा. (२००७) सेक्स्च्युॲलिटी (नवी दिल्ली : काली फॉर विमेन)

# संदर्भ


ॲग्निस, फ्लेव्हिआ (२००६) : 'अ रे ऑफ सुप्रिम होप फॉर बार डान्सर्स' दि एशियन एज पुणे, ०२ जून २००६

अप्पादुराई, अर्जुन (२००७) : फिअर ऑफ स्मॉल नंबर्सः ॲन एसे ऑन दी जिओग्राफी ऑफ ॲंगर (कोलकत्ता : सिगल)

काळे, वर्षा : 'लेटर टू दि गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र,' http//www.nswp.org/right/bargirls/letter-governor.html, १३ जून २००९ ला उपलब्ध

केतकर, कुमार, इंडियन एक्सप्रेस मधून, पुणे, २३ एप्रिल २००५

कुंदा, प्रमिलानी (विनादिनांक) – डान्स बार बॅन डिबेट : स्टॅड पॉईट, दलित बहुजन महिला (विचारमंच प्रकाशन, मुंबई)

मेहरोत्रा, दिप्ती प्रिया, (२००८) गुलाब बाई : दि क्विन ऑफ नौटंकी थिएटर (नवी दिल्ली : पेंग्विन)

मेनन, निवेदिता, संपा., (२००७), सेक्स्युॲलिटी, (नवी दिल्ली : काली फॉर विमेन)

पटनाईक, प्रभात (२००३) : दि रिट्रिट टू अनफ्रिडम : एसेस ऑन दि इमर्जिंग वर्ल्ड ऑडर (तुलिका : नवी दिल्ली)

तेलतुबडे, आनंद (२००८), खैरलांजी : अ स्ट्रेंज ॲण्ड बिटर क्रॉप (नवी दिल्ली : नवयान)

विमेन ग्रुप्स इन मुंबई : पॅम्फ्लेट इन ह्यूमनस्केप, मुंबई, मे २००५, पृष्ठ – २४


## डान्सबारमध्ये नोटा उधळल्या तर कारवाईला सामोरे जावे लागणार

### सरकारची नवी नियमावली तयार



● मुंबई । प्रतिनिधी

डान्सबार ही वेश्याव्यवसायाची पहिली पायरी आहे, असं म्हणत राज्य सरकारने २००५ साली राज्यातील डान्स बार बंद केले. मात्र डान्सबार असोसिएशनने तेव्हापासून सरकारच्या या निर्णयाविरुध्द न्यायालयीन लढाई चालवली होती. अखेर शेवटी ती जिंकली. तरीही राज्य सरकारने आता नवी नियमावली तयार करण्याचं ठरवलं आहे. सुप्रीम कोर्टानं फटकारल्यानंतर आता राज्य सरकारनं हा निर्णय घेतल्याचं समजतं. त्यानुसार डान्स बारमध्ये सीसीटीव्ही बसवणं बंधनकारक करण्यात येणार आहे. तर बारबालांवर नोटा उधळण्यासही बंदी घालण्यात येणार आहे. असे केल्यास कारवाईला सामोरं जावं लागणार आहे, असं सुत्राचं म्हणणं आहे.

ही छम्मछम सुरु झाल्यानंतर प्रत्येक डान्सबारमध्ये केवळ चार ते पाचच लेडीज डान्सर असणं बंधनकारक करण्यात येणार आहे. त्यापेक्षा अधिक डान्सर्स बारमध्ये ठेवता येणार नाहीत. पूर्वी एका बारमध्ये १२ पेक्षाही अधिक डान्सर असायच्या. त्यामुळे बारमध्ये जाणाऱ्यांचा जास्त प्रतिसाद मिळत असे. बारमधूनच येथील डॉन्सर्स मुली वेश्याव्यवसायाकडे वळतात, असेही काही प्रसंगी दिसून आले आहे. त्या ठिकाणी अश्लिल चाळे चालतात, अशीही माहिती आहे. सरकारच्या नव्या निर्णयानुसार सीसीटीव्हीमुळे तेथे काय चाललंय हेही दिसेल आणि सरकारी अधिकाऱ्यांचंही लक्ष राहील, असा व्होरा नव्या नियमावलीबाबत व्यक्त करण्यात येत आहे.

पूर्वी डान्सर्स आणि ग्राहक यांच्यामध्ये फारस अंतर नसे. त्यामुळे डान्सरचा हात धरुनही शौकीन नाचत होते. आता नव्या नियमानुसार डान्सर आणि ग्राहक यांच्यात किमान पाच फुटांचं अंतर राखणंही सक्तीचं करण्यात येणार आहे.

पूर्वी ग्राहक आपल्या आवडत्या डान्सरवर स्वतःच मुक्त हस्ताने नोटांची उधळण करत. त्यानंतर नोटा तेथील कर्मचारी, बारबाला आणि ग्राहकांच्या पायाखाली पडत असत. आता नव्या नियमावलीमुळे बारमध्ये नोटा उधळायलाही मनाई करण्यात येणार आहे. बारमध्ये धुम्रपान करण्यासही बंदी घालण्यात येणार आहे. त्यामुळे या सरकारी नियमावलीच्या विरोधात बारबालांच्या संघटना काय भूमिका घेतात हे पुढील काळात दिसेल.